लोकमत

# उरळ येथे सायबर क्राइमबाबत कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

उरळ : श्री शिवशंकर विद्यालयात सायबर क्राइमबाबत कार्यशाळा पार पडली.

यामध्ये सायबर म्हणजे काय, सायबर क्राइमचे कोणते प्रकार पडतात, वाढत्या सोशल मीडियाच्या माध्यमातून ऑनलाइन फसवणूक कशी होते, मोबाइलमध्ये येणाऱ्या नवीन ॲप्सद्वारे डेटा कशा प्रकारे चोरी केल्या जातो आणि त्याद्वारे कशी फसवणूक होते. व्हॉट्सॲप, फेसबुक अकाउंट हॅक कसे केले जाते, फेक वेबसाइट्स



कशा ओळखाव्या, एटीएम पासवर्ड ओटीपी याबाबत अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या वैष्णवी बेलंगे आणि सलोनी जैस्वाल यांनी मार्गदर्शन केले. ऑनलाइन फसवणुकीपासून कसे दूर राहावे, कोणती काळजी घ्यावी, सायबर सुरक्षा याविषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. हा उपक्रम क्विक हिल फाउंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल मुंबई यांच्या सहयोगाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात मार्गदर्शनाखाली आयोजित केला होता. यावेळी मुख्याध्यापक बी. जी. पोहरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पर्यवेक्षक व शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.